# स्मार्ट नाशिक सिटी

नाशिक महानगरपालिका खाजगी प्रकाशन

नाशिक वर्ष १, अंक ४ मासिक वृत्तपत्रिका जून २०१७


## मनपाकडून संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे स्वागत









**नाशिक** : जुलै महिन्यात पंढरपुर येथे साजऱ्या होणाऱ्या आषाढी एकादशीच्या पार्श्वभुमीवर त्र्यंबकेश्वर येथून प्रस्थान केलेल्या संत निवृत्तीनाथ पालखीचे शहरात दाखल झाल्यानंतर त्र्यंबकरोडवरील जलतरण तलाव येथे उपमहापौर प्रथमेश गिते आणि सभागृह नेते दिनकर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पालखीचे स्वागत करण्यात आले. यावेळी संत निवृत्तीनाथ पालखीतील ३५ दिंडी प्रमुखांना एलईडी लाईट असलेल्या रिचार्जेबल बॅटरी महानगरपालिकेकडून भेट वस्तू देण्यात आल्या. यावेळी बोलताना संत निवृत्ती महाराज संस्थाचे अध्यक्ष संजय महाराज धोंडगे यांनी पालखीच्या संपूर्ण प्रवासाची माहिती दिली. मनपा सभागृह नेते दिनकर पाटील यांनी पालखी सोहळ्यातील भाविकांचे स्वागत केले.

स्वागत समितीचे अध्यक्ष पद्माकर पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. शिवडी येथील दत्ता शेळके यांच्या बैलगाड्यांना पालखीसाठी मान मिळवला. माजी नगरसेवकांच्या मातोश्री लक्ष्मीबाई जायभावे यांनी पालखी विणेकरींना, वीणा भेट दिली. स्वागत समारंभाप्रसंगी व्यासपीठावर पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंघल, भक्तिचरणदास महाराज, पंडित महाराज कोल्हे, मोहन महाराज बेलापुरकर, उपमहापौर प्रथमेश गिते, गटनेते गजानन शेलार, दिक्षा लोंढे, प्रभाग सभापती हेमलता पाटील, नगरसेवक गुरमित बग्गा, नगरसेविका प्रियंका घाटे, माजी नगरसेवक तानाजी जायभावे, उपायुक्त हरिभाऊ फडोळ, रोहिदास बहिरम, संजय महाराज धोंडगे, पंडित महाराज कोल्हे, भक्तिचरदास महाराज, मोहन महाराज खेलापुरकर, लहवीतकर महाराज डॉ. धनश्री हरदास व आण्णा साहेब महाराज आहेर, किशोर घाटे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

तसेच जनसंपर्क अधिकारी यशवंत ओगले, हिरामन जगझाप, गोपीनाथ हिवाळे, नितीन गंभीरे, जयश्री गांगुर्डे, लता पाटील, हुसेन पठाण, विरसिंग कामे, सुकलाल पवार, बंडोपंत गोवर्धने आदींसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## इदगाह मैदानावर रमजान ईद उत्साहात साजरी





**नाशिक** : नाशिक महानगरपालिकेच्या वतीने रमझान ईदच्या पार्श्वभुमीवर ईदगाह मैदानावर मुस्लीम बांधवांना महापौर रंजना भानसी व पदाधिकारी यांनी गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा दिल्या. तसेच शहर ए खतीब हिसामोद्दीन अशरफी यांना महापौर रंजना भानसी, खासदार हेमंत गोडसे, आमदार बाळासाहेब, सानप, उपमहापौर प्रथमेश गिते, सभागृह नेते दिनकर पाटील, स्थायी समिती सभापती शिवाजी गांगुर्डे, गटनेते शाहू खैरे, प्रभाग सभापती डॉ. हेमलता पाटील, भाजप नेते लक्ष्मण सावजी, माजी मंत्री डॉ. शोभा बच्छाव नगरसेवक अरूण पवार, जगदिश पाटील विनायक पांडे, समीर कांबळे, नगरसेविका वत्सला खैरे, डॉ. दिनेश बच्छाव, मीर मुक्तार अशरफी जनसंपर्क अधिकारी यशवंत ओगले, हिरामण जगझाप, बाळासाहेब शिंदे, नितीन गंभीरे, गोपीनाथ हिवाळे, हुसेन पठाण संतोष काहाणे आदी उपस्थित होते.



## मनपाच्या भालेकर शाळेत नापास विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण

**नाशिक** : मनपा शिक्षण समितीने जून महिन्यापासून महापालिकेच्या बी.डी. भालेकर माध्यमिक शाळेच्या इमारतीतील दहावी परीक्षेत अनुतीर्ण विद्यार्थ्यांसाठी नापासांची शाळा हा उपक्रम सुरू करण्यात आला.

१७९ अनुतीर्ण विद्यार्थ्यांना संपर्क साधून ह्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. तसेच जे विद्यार्थी सातवी ते नववी पर्यंतच शिक्षण घेऊ शकले अशा विद्यार्थ्यांना १७ नंबरचाफॉर्म भरून त्यांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विनामुल्य शिक्षण देण्यात येईल. केवळ दहावी बोर्डाचे शुल्क आकारण्यात येईल.

उपक्रमात विनामूल्य शिक्षण देण्यात आतापर्यंत निवृत्त शिक्षकांनी तयारी दर्शविली आहे. शाळेच्या उपक्रम विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार सकाळी व संध्याकाळी प्रत्येकी २ तास प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे असे मनपा शिक्षण समितीचे प्रशासनाधिकारी नितीन उपासनी यांनी आपले मत व्यक्त केले.

## नाशिक पश्चिम विभागात रात्रीची स्वच्छता मोहिम

**नाशिक** : नाशिक पश्चिम विभागातील प्रभाग क्र. ७, १२ व १३ रात्रपाळीमध्ये जागतिक दिनाचे औचित्य साधुन स्वच्छता मोहिम प्रभाग सभापती डॉ. हेमलता पाटील यांच्या उपस्थितीत सुरू करण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत २५ सफाई कर्मचाऱ्यांची नेमणूक करून स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. सभा घेऊन या सभेत पावसाळी पूर्व कामांच्या नियोजनाबरोबर आरोग्य, पाणीपुरवठा, घंटागाडी मलेरिया धुर फवारणी घंटागाडीवरील जीपीएस यंत्रणा, ओला व सुका कचऱ्याचे विलगीकरण याविषयी विभागीय अधिकारी नितीन नेर विभागीय स्वच्छता निरिक्षक, मलेरिया धुर, फवारणी करणारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

या सभेत पश्चिम विभागातील प्रभाग क्र. ७, १२ व १३ या तीनही प्रभागांमध्ये रात्रीची स्वच्छता मोहिम करण्यात आली असून सफाई कामांबरोबर घंटागाडी सुरू होती. येत्या दोन महिन्यांत कुठेही कचरा राहणार नाही. याची व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्येक प्रभागामध्ये रात्रीच्या स्वच्छता मोहिमेकरीता २५ कर्मचाऱ्यांची ८ ते ११ या दरम्यान सफाईची कामे करण्यात केली गेली. त्यासाठी आराखडा करण्यात आला होता. या बैठकीत ओला व सुका कचरा विलगीकरण करून हिरव्या व निळ्या कचरा कुंड्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच धूर फवारणीचे वेळापत्रक आराखड्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते गजानन शेलार, नगरसेवक समीर कांबळे, सहाय्यक आरोग्यधिकारी डॉ. सचिन हिरे, विभागीय अधिकारी नितीन नेरे आदी उपस्थित होते.

## मनपाच्या नोटीसा : पुररेषेतील धोकेदायक घरांना

**नाशिक** : नाशिक शहरातील धोकेदायक घरांना, जुने वाड्यांना पावसाळ्याच्या पार्श्वभुमीवर मनपाचे आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी नोटीसा बजावण्याचे आदेश दिले असून महापालिकेतील मुख्यालयात आपत्ती व्यवस्थापन कक्षाद्वारे पुर परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी २४ तास कार्यान्वित करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. महापालिका आयुक्तांनी पावसाळ्याच्या पार्श्वभुमिवर सर्व खातेप्रमुखांची आढावा बैठक घेतली व आपत्कालीन परिस्थितीसाठी सज्जतेच्या सुचना दिल्या. पावसाळ्यामध्ये वाघाडी, नासर्डी, गोदावरिसह वालदेवी नदीनाल्यांना पुर येत असल्याकारणामुळे जीवित व वित्तहानी होऊ नये यासाठी मनपातर्फे उपाययोजना करण्याचे निर्देश मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी सर्व खातेप्रमुखांना दिल्या. जुने नाशिक तसेच पंचवटी ह्या भागात मोठ्या प्रमाणात जुने वाडे असून त्यातील बहुतांश वाडे मोडकळीस आलेत. त्यामुळे ते कोसळण्याची शक्यता असल्या कारणास्तव जीवित व वित्तहानी होण्याची धोका संभवतो अशा धोकादायक वाड्यांचे बांधकाम विभागाने सर्वेक्षण करून त्यांना नोटीसा देण्यात याव्या अशा सुचना मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी दिल्या पूर बाधित कुटुंबाना सुरक्षित स्थळी हलवुन त्यांना मुलभुत गरजा आणि सुविधा पुरविण्याचे नियोजन करण्याच्या सुचना देण्यात आल्या. पावसामुळे अनेकवेळा झाडे तुटुन विद्युत तारांवर कोसळल्याने विज पुरवठा खंडित होतो. त्यावर विद्युत विभागाने उपाययोजना करण्यात तसेच आपतकालीन परिस्थितीत अग्निशमन विभागाने फ्लड लाईट, लाइफ सेव्हिंग बोट, दोरखंड आदी सर्व यंत्रणा सज्ज ठेवाव्यात अशा सुचना आयुक्तांनी खाते प्रमुखांना दिल्या. पुरपरिस्थितीत वेळेवर मदत पोहोचविण्यासाठी तसेच विविध विभागांनामध्ये समन्वय साधण्यासाठी महापालिका मुख्यालयात २४ तास आपतकालीन कक्ष कार्यान्वित केले असून विविध विभागांतील कर्मचाऱ्यांना तीन शिफ्टमध्ये चार महिन्यांकरीता नियुक्ती करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीला उपायुक्त विजय पगार, रोहिदास दोरकुळकर, रोहिदस बहिरम, हरिभाऊ फडोळ, शहर अभियंता उत्तम पवार यांच्यासह विविध खात्यांचे प्रमुख उपस्थित होते.





## महापालिकेची आपत्कालीन यंत्रणा सज्ज; व्हॉटसअॅपद्वारे पुरग्रस्तांना मिळणार अलर्ट

**नाशिक** : महानगरपालिकेने पावसाळ्याच्या दमदार हजेरीचा अंदाज पाहता राजीव गांधी भवन येथील महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने आपत्कालीन कक्षाची हाताळण्यासाठी १३५ दिवसांचा कृती आराखडा तयार केला आहे. महापालिकेसह सहाही विभागीय कार्यालयांमध्ये आपत्कालीन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. महानगरपालिकेचे अग्निशमन दलाचे मुख्य अधिकारी अनिल महाजन यांनी मनपाने केलेल्या आपत्कालीन कृती आराखड्याचे माहिती दिली. मुख्यालयातील सुमारे ८०० कर्मचारी ३ पाळींमध्ये काम करण्यास येणार आहे. यामध्ये अग्निशमन दलाचे १०३ कर्मचारी कार्यरत राहणार आहे. तसेच अग्निशमन पथकासोबत बांधकाम विभाग, उद्यान विभाग, भुमिगत गटार विभाग पाणी पुरवठा विभाग, विद्युत विभाग, जनसंपर्क विभाग इ. कर्मचाऱ्यांना सज्ज राहण्यास संबंधित खाते प्रमुखांना सुचना देण्यात आल्या.

या १३३ दिवसांच्या नियोजनात महापालिकेकडून पावसाळ्यात आपत्कालीन स्थितीत जीवीत व वित्तहानी टाळण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असली तरी यात अग्निशमन दलाची मोठी जबाबदारी असून यात ४ रबरी बोट व २ फायर बोट अशी ६ बोट मशिनसह सुस्थितीत तयार ठेवण्यात आल्या आहे. नदीकाठालगतच्या भागात महापालिकेच्या विभागीय अधिकाऱ्यांकडून सर्वे केला गेला. या भागांतील नागरिकांचेफोन नंबर व नावे घेतली गेली. तसेच या नागरिकांचा व्हॅटसअॅप ग्रुप तयार करून नदीच्या पातळी धोक्याची सुचना दिल्या जातील. त्याचबरोबर महापालिकेच्या शाळा व समाज मंदिर यांची स्थिती निवाऱ्या करीता योग्य आहे हे तपासून घेण्यात आले.

## मनपाकडून १ महिन्यांची मुदत अनधिकृत नळ कनेक्शन धारकांना

**नाशिक** : महानगरपालिका हद्दीत सद्यस्थितीत १ लाख ८६ हजार नळकनेक्शन आहे. मनपाने पाण्याची गळती थांबविणे आणि चोरीला जाणारे पाणी बंद व्हावे त्या अनुषंगाने मनपाने अनधिकृत नळकनेक्शन विरोधात कारवाईची तयारी केली असून अनधिकृत नळकनेक्शन धारकांना कनेक्शन दंड भरून अधिकृत करण्यासाठी शेवटची संधी म्हणून एक महिन्याची मुदत मनपा तर्फे देण्यात आली.

शहराला दररोज १६ ते १७ दशलक्ष घनफुट इतका पाणीपुरवठा केला जातो. यापैकी ४० टक्के पाणी चोरीला जाते किंवा त्याची गळती होते. शहरात एक लक्ष ८६ हजार इतक्या जोडण्या आहे. तर ३ लक्ष ५८ हजार इतकी मालमत्तांची नोंद आहे. मालमत्तांची संख्या पाहता २ लाखाहून अधिक कमी नळजोडणी धारकांची संख्या संशयास्पद आहे. यामुळेच नळजोडणी शोध मोहिम सुरू केली आहे. त्यासाठी प्रशासनाने प्रस्ताव तयार करून तो महासभेसमोर ठेवण्यात आला. अनाधिकृत नळकनेक्शन घेतलेल्या मालमत्ताधारकांना एक महिन्याची मुदत देऊन संबंधितांनी दंड भरून नळकनेक्शन अधिकृत करून घेण्याचे आवाहन अतिरिक्त आयुक्त किशोर बोर्डे यांनी केले आहे.

# महापालिकेतर्फे नद्यांची स्वच्छता मोहिम

**नाशिक** : महानगरपालिकेच्या वतीने तसेच सामाजिक संस्थाद्वारा जागतिक पर्यावरणदिनाचे औचित्य साधून गोदावरी, नासर्डी, वालदेवी, वाघाडी नदीतील ११ ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविली आहे.

गोदास्वच्छता अभियानाचे नियोजन मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांच्या उपस्थितीत तसेच सामाजिक संस्था एनजीओ आणि स्वयंसेवी संस्थां प्रतिनीधीसोबत बैठक घेतली गेली. या बैठकीस उपमहापौर प्रथमेश गिते उपस्थित होते. यावेळी उपायुक्त रोहिदस दोरकुळकर यांनी गोदा स्वच्छता मोहिमेची माहिती दिली. नदी स्वच्छतेची ठिकाणे, गोदावरी वरील होळकरपुल ते गौरी पटांगण, गौरी पटांगण ते टाळकुटेश्वर पूल, तपोवन, लक्ष्मीनारायण घाट, टाकळी पूल ते परिसरातील घाट, नांदूर मानूर परिसर व घाट, नासर्डी वरील आयटीआय पूल ते सिटी सेंटर मॉल, तिडके कॉलनी, मुंबईनाका, वाघाडीवरील लक्ष्मण झुला तसेच वाल देवी नदीवरील रोकडोबावाडी पूल ते कॅम्प पूल, विहितगाव इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार आहे.



अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई आयोजित १५ वी सभा महाराष्ट्र महापौर परिषद, मुंबई येथे पार पडली. या बैठकीत नाशिकच्या महापौर रंजना भानसी उपस्थित होत्या. तसेच मुंबईचे महापौर विश्वनाथ महाडेश्वर, पुणे मुक्ता टिळक, लातुर सुरेश पवार, धुळे कल्पना महाले, नागपूर नंदा जिचकर, मिराभाईंदर गिता जैन, अकोला विजय अग्रवाल, सांगली अरूण शिकालगर आदी मान्यवर उपस्थित होते.

# मनपा कार्यालयात जीएसटीची कार्यशाळा

**नाशिक** : जीएसटी ही भारतातील सर्वात आर्थिक सुधारणा कर प्रणाली आहे. संपूर्ण देशभरात १ जुलै पासून लागु झाली आहे. वस्तु आणि सेवा ह्यांना लागु असणारा व्हॅटसह इतर सर्व सरकारच्या वेगवेगळ्या करप्रणालीना पर्याय म्हणून जीएसटीकडे पाहिले जाते. महानगरपालिकेतील अधिकारी-कर्मचारी यांना जीएसटी करप्रणालीचे प्रशिक्षण देण्यात आले.





प्रथम महापालिकेचे सनदी लेखापाल योगेश कटारिया यांचे स्वागत महानगरपालिकेचे मुख्य लेखाधिकारी एस.बी. भोर यांनी केले. महापालिकेत जीएसटीमुळे होणारे बदलाबाबत योगेश कटारीया यांनी माहिती उपलब्ध करून दिली. तसेच महापालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी जीएसटी बद्दल विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे कटारीया यांनी त्याची पुर्तता केली.

तसेच महापालिकेच्या प्रत्येक विभागाने जीएसटी लागू झाल्यानंतर कशी काळजी घ्यावी. या बाबतच्या सुचना करून उपमुख्य लेखाधिकारी एस.व्ही. घोलप यांनी सनदी लेखापाल योगेश कटारीया यांचे आभार मानले.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



**नाशिक** : नाशिक महानगर पालिकेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मनपा मुख्यालयातील स्वागत कक्ष येथे महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस उपमहापौर प्रथमेश गिते यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास स्थायी समिती सभापती शिवाजी गांगुर्डे, नगरसेवक उद्धव निमसे, समीर कांबळे, दीक्षा लोंढे, अति आयुक्त किशोर बोर्डे, उपायुक्त हरिभाऊ फडोळ, विजय पगार, रोहिदास दोरकुळकर, मुख्य लेखाधिकारी सुभाष भोर, मुख्यलेखा परीक्षक महेश बच्छाव, कार्यकारी अभियंता उदय धर्माधकारी, बी.जी. माळी, जनसंपर्क अधिकारी यशवंत ओगले, हिरामण जगझाप, नितीन गंभीरे, हुसेन पठाण, संतोष कान्हे, विशाल घागरे, वीरसिंग कामे, लता पाटील आदींसह अधिकारी कर्मचारी उपस्थीत होते.

# ६७ हजार प्रकरणे मनपाच्या नागरी सुविधा केंद्रात

**नाशिक** : राज्य शासनाच्या आपलं सरकार उपक्रमाच्या धर्तीवर मनपाने नागरी सेवा केंद्रांची दीड महिन्यापूर्वी सुरूवात केली होती. यामध्ये एकूण ४५ सेवांना मोठा प्रतिसाद मिळाला स्मार्ट सिटीच्या दिशेने शहराचा सुरू असलेल्या विकासात ६७ हजार ५०० नागरिकांनी या ऑनलाइन सेवांचा लाभ घेतला. शहरात विविध ठिकाणी असे २२ नागरी सुविधा केंद्र मनपाने सुरू करून ४५ प्रकारच्या ऑनलाइन सेवा दिल्या आहे. या सेवा नागरिकांना मुदतीत मिळाव्यात याकरिता आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी ही नागरी सुविधा केंद्र सुरू केले. या ४५ सेवांपैकी ३२ सेवांची प्रकरणे दाखल झालेली असून त्या मुदतीत पूर्ण झालेले आहे. या प्रकरणांकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरी सुविधा केंद्र महापालिका आणि ऐस बँकेच्या संयुक्तरित्या सुरू केले असून यामध्ये ऐस बँकेचे कर्मचारी आणि मनपाचा एक कर्मचारी कार्यरत आहे. या दाखल झालेल्या प्रकरणात बांधकाम परवानगीसाठी ७७० प्रकरणे, बांधकम पूर्णत्वाचे दाखले ८४९, नळ जोडणी ४२०, मालमत्ताकर उतारा ३६८, मालमत्ता हस्तांतरण ६०३, मृत्यु दाखले १३९९, सुधारित बांधकाम परवानगी १२४, पाळीव श्वान परवाना ७१, सोनोग्राफी सेंटर परवानगी ८, जाहिरात परवानगी २, विवाह नोंदणी २९, यासह विविध सेवांसाठी प्रकरणे दाखल झाली आहे.

# अनधिकृत गोठेधारकांना नोटीस; बायोगॅस प्रकल्पाची सुचना

**नाशिक** : शहरातील अनधिकृत गोठेधारकांना महापालिकेमार्फत नोटीसा बजावण्यात आल्या असून नगररचना विभागाला मोजमाप करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त किशोर बोर्डे यांनी दिली.

त्यानुशंगाने महापालिकेतर्फे कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे. तसेच अधिकृत गोठेधारकांना गोठ्यांतून निघणाऱ्या मलमुत्रांतुन बायोगॅस तयार करण्याच्या सुचना गोठेधारकांना देण्यात आल्या. त्यासाठी नोडल अधिकारी म्हणून महापालिकेचे कार्यकारी अभियंता नितीन वंजारी व आरोग्य अधिकारी डॉ. सुनिल बुकाणे यांची नियुक्ती केली आहे.

शहरातील अनधिकृत गोठ्यांसदर्भात अतिरिक्त आयुक्त किशोर बोर्डे यांच्या दालनात ही बैठक पार पडली. या बैठकीत नगरसेवक सतिश कुलकर्णी उपस्थित होते. शहरात ५० हून अधिक जनावरांचे गोठे आहेत. त्यातील बहुतांश गोठे नागरी वस्तीत असल्यामुळे त्या गोठ्यामधील मलमुत्र उघड्यावर असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे.

गोठे धारकांना दुग्ध विकास विभागाकडे परवाना तसेच नुतनीकरण न केल्याने महापालिकेतर्फे नोटीसा देण्यात आल्या. तसेच अनधिकृत गोठेधारकांचे परवाने नुतनीकरण करू नये असे पत्र महापालिकेने शासनाच्या दुग्ध विकास विभागाला दिले आहे

# महानगरपालिकेतर्फे वृक्षलागवड दिनाचे आयोजन

**नाशिक** : राज्य शासनाच्या दि. १ जुलै ते ७ जुलै दरम्यान संपूर्ण राज्यात चार कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमा अंतर्गत नाशिक महानगर पालिकेस पाच हजार वृक्ष लागवडीसाठी उद्दिष्ट दिले होते. त्यानुसार मनपातर्फे स.नं २५७, २५९ म्हसोबावाडी, म्हसरुळ (पंचवटी) येथे पाच हजार नग वृक्ष लागवडीचे नियोजन केले होते. त्यातील पहिल्या वृक्षाची लागवड महापौर रंजना भानसी यांच्या शुभहस्ते करण्यात आली. वृक्षलागवड प्रसंगी आयुक्त अभिषेक कृष्णा, उपमहापौर प्रथमेश गिते, स्थायी समिती सभापती शिवाजी गांगुर्डे, नगरसेवक अरुण पवार, नगरसेवक उध्दव निमसे आदी पदाधिकारी व उद्यान अधिक्षक बी.यु.मोरे , कार्यकारी अभियंता तिवारी, वृक्ष अधिकारी गोसावी, सोनवणे मॅडम, नितीन नेर, उद्यान विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच सोशल नेटवर्किंग फोरम, इंडियन मेडिकल असोशिएशन, पंचवटी महाविद्यालय, अप्पासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान आदी संस्थेचे सदस्य, सहभागी झाले होते. त्यात आज वृक्षांची लागवड करण्यात आली यात प्रामुख्याने वड, पिपळ, कडुनिंब, कदंब, आंबटचिंच, सप्तपर्णी, रेनट्री आदी वृक्षांची लागवड करण्यात आली. सदर कार्यक्रम पूर्ण सप्ताह राबविण्यात येणार आहे.









# मनपा आयुक्तांकडून पंचक येथील सहा एकर उद्यानाची पाहणी





**नाशिक** : शहरात मनपाचे ४५० इतकी उद्याने आहेत केंद्र शासनाच्या अमृत योजनेंतर्गत शहरातील पंचक येथील ६ एकरमध्ये साकार होणार आहे.

केंद्र शासनाच्या या अमृत योजनेंतर्गत पंचक उद्यानासाठी एक कोटीचा निधी मंजूर असून यापैकी ७० लाखांचा निधी मनपाला प्राप्त झाला आहे. या उद्यानामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. असूनस्वच्छता गृह लॉन्स, खेळाच्या, रस्ता व इतर सुविधांची कामे केली जाणार आहे.

त्यादरम्यान महापालिका आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी पंचक येथील उद्यानाच्या कामाची माहिती घेतली. यावेळी मिळकत व्यवस्थापन बी.यु. मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्मार्ट नाशिक सिटी
नाशिक महानगरपालिका खाजगी प्रकाशन
संपादित व प्रकाशित : अभिषेक कृष्णा आयुक्त,
अतिरिक्त आयुक्त किशोर बोर्डे, उपायुक्त हरिभाऊ फडोळ
संपादकीय समन्वयक : चेतन श्रीराम घरटे (ग्लोबल सेलोरा सिस्टम)